# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना व प्रशासन विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

email :- registrar@unigug.ac.in दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३१०४ email:- establishment.section@unigug.ac.in


जा.क्र. गो.वि./आस्था./२३० /२०२६ दि. १८/०१/२०२६

## परिपत्रक

**विषय :- विद्यापीठात दुचाकी / चारचाकी वाहनाने प्रवेश करताना वाहनचालकांसाठी मार्गदर्शक सूचना.**

**संदर्भ :- 1. स्क्वाड्रन लीडर विकी अग्रवाल (वेटरन) यांचे दि. 16/12/2025 रोजचे पत्र.**
**2. मा. राज्यपाल महोदयांचे सचिवालयाचे पत्र दि. 09/01/2026.**

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, रस्ते अपघातांमुळे तरुणांच्या जीवाला मोठा धोका निर्माण होत असल्याने, विद्यापीठ व त्यास संलग्न सर्व महाविद्यालयांनी रस्ता सुरक्षेबाबत ठोस उपाययोजना करण्याबाबत आणि विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयांनी **११ ते १७ जानेवारी २०२६ या कालावधीत राष्ट्रीय रस्ता सुरक्षा सप्ताह–२०२६** प्रभावीपणे राबविण्याबाबत संदर्भिय पत्राद्वारे सूचना देण्यात आलेल्या आहेत. रस्ता सुरक्षेबाबत ठोस उपाययोजना करण्यासंदर्भात दुचाकी व चारचाकी वाहनचालकांना हेल्मेट व सीटबेल्ट सक्ती करण्याबाबत तसेच वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत सूचना केलेल्या आहेत.

**त्याअनुषंगाने विद्यापीठात प्रवेश करताना सर्व वाहनचालकांसाठी विद्यापीठ प्रशासनाकडून पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.**

1. **हेल्मेट व सीटबेल्ट सक्ती** - यापुढे विद्यापीठात वाहनाने प्रवेश करताना वैध वाहनचालक परवान्यासह हेल्मेट / सीटबेल्ट लाऊनच प्रवेश करावा. हेल्मेट / सीटबेल्ट न वापरणाऱ्या कर्मचारी अथवा विद्यार्थ्यांच्या वाहनांना कॅम्पसमध्ये प्रवेश देण्यात येणार नाही.
2. **वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई** - वैध वाहनचालक परवाना, हेल्मेट किंवा सीटबेल्टशिवाय वाहनाने विद्यापीठ परिसरात प्रवेश केल्यास संबंधित कर्मचारी / विद्यार्थी यांचेवर दंडात्मक कारवाई केली जाईल.

करीता सर्वांनी नोंद घ्यावी.

**(डॉ. अनिल हिरेखण)**
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलिपी :-**

१. मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरू महोदयांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

P.T.O.

३. मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित.

४. सर्व प्रशासकिय/शैक्षणिक विभागांचे मा. विभाग प्रमुख / समन्वयक/कार्यालय प्रमुख, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांनी सदरहू परीपत्रक आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी तसेच विद्यार्थी यांना निदर्शनास आणून द्यावे.

५. मा. प्राचार्य, आदर्श पदवी महाविद्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित.

६. मा. मुख्य कार्यक्रम अधिकारी, STRC, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित.

७. सिस्टीम ॲनालिस्ट, संगणक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना सुचित करण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

८. सहा. कुलसचिव / उपकुलसचिव, महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांनी सदर परिपत्रक सर्व संलग्नित महाविद्यालयांना अवगत करुन द्यावे.

९. पर्यवेक्षक, सुरक्ष रक्षक, गोंडवाना विद्यापीठ कार्यक्षेत्र यांना उपरोक्तबाबत उचित कार्यवाहीकरीता अग्रेषित.

१०.सुरक्षा रक्षक, गोंडवाना विद्यापीठ मुख्य प्रवेशद्वार यांना सूचित करण्यात येते की, विद्यापीठात दुचाकी / चारचाकी वाहनाने प्रवेश करताना हेल्मेट किंवा सीटबेल्ट न वापरणाऱ्या कर्मचारी अथवा विद्यार्थ्यांच्या वाहनांना कॅम्पसमध्ये प्रवेश देऊ नये. वैध वाहनचालक परवाना, हेल्मेट किंवा सीटबेल्टशिवाय विद्यापीठात प्रवेश करणारे कर्मचारी / वाहन यांची नोंद घेऊन त्याची माहिती मा. कुलसचिव महोदयांना सादर करावी.

११.संबंधित संस्था / कार्यालय / विभाग ---------------------------------------------------------------------------

१२.आस्थापना विभाग(नस्ती), गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**(डॉ. कामाजी देशमुख)**
प्र. उपकुलसचिव, आस्था.
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली